**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२३**

---------------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ / चैत्र २, १९४५ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग,संसदीय कार्ये मंत्री**<br>**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री**<br>**(३) उद्योग मंत्री**<br>**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**<br>**(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

--------------------------------

**औरंगाबाद येथील बीड बाय पास रस्त्यावर चुकीच्या पद्धतीने बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलाबाबत**

**(१) * ५८१०७ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे बांधण्यात आलेल्या बीड बाय पास येथील उड्डाणपुलाची उंची कमी असल्यामुळे उड्डाणपुलाखालून मिनी बस, बस, ट्रक, तसेच इतर मोठी वाहने जाऊ शकत नसल्याने वाहतुकीची समस्या निर्माण झाल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे नागरिकांच्या पैशाचा अपव्यय झाला असून आता उड्डाणपुलाच्या खालून खड्डा करून उंची वाढवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** ( १) हे खरे नाही.
तथापि, याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये बातमी आलेली आहे.
(२) हे खरे नाही,
सदरचे काम मंजूर आराखडयानुसार पुर्ण केल्यानंतर वाहतूकीकरीता ५.५० मीटर व्हर्टीकल क्लीअरन्स उपलब्ध होणार आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## "द लॅक्सीकॉन इंटरनॅशनल स्कूल, वाघोली" या शाळेने फी न भरलेल्या विद्यार्थ्यांना डांबून ठेवल्याबाबत

**(२) * ५७२६३ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (जि.पुणे) येथील "द लॅक्सीकॉन इंटरनॅशनल स्कूल" मधील विद्यार्थ्यांनी शाळेची फी भरली नाही म्हणून त्यांना डांबून ठेवल्याचे दिनांक १८ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पालकांनी विचारणा केली असता शाळा व्यवस्थापनाने धमकावल्याने पालकांनी स्थानिक पोलीस ठाणे, लोणंद यांचेकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने लोणंद पोलीस ठाण्यात सदर शाळा व्यवस्थापनाच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१), (२) व (३) "द लॅक्सीकॉन इंटरनॅशनल स्कूल" मधील विद्यार्थ्यांना शाळेची फी भरली नाही म्हणून शाळा सुटल्यानंतरही थांबवून ठेवल्याची घटना दि.१८/०१/२३ रोजी घडली होती.

पालक शाळेत आल्यानंतर व्यवस्थापन व पालकांत वादही झाले होते. याबाबत त्रयस्थ व्यक्तींनी लोणंद पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला होता परंतू अधिक चौकशीसाठी पोलिसांनी बोलावूनही अर्जदार किंवा पालकांपैकी कुणीही हजर न राहिल्याने तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

भविष्यात असा प्रकार होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना शाळेस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याबाबत

**(३) * ६२५०६ श्री.राजू कारेमोरे (तुमसर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांचा शेतीचा वाढता उत्पादन खर्च व नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत असलेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या दराव्यतिरिक्त राज्य शासनाकडून प्रोत्साहन राशी दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्ष २०१८-१९ मध्ये ५०० रुपये प्रति क्विंटल तर वर्ष २०२०-२१ मध्ये ७०० रुपये प्रोत्साहन राशी देण्याची मर्यादा मंजूर करण्यात आली परंतु, यावर्षी प्रतिहेक्टरी १५ हजार रुपये २ हेक्टरच्या मर्यादेत देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी माहे डिसेंबर,२०२२ मधील हिवाळी अधिवेशनादरम्यान केली होती,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रति हेक्टर धानाचे उत्पादन सरासरी ३८ क्विंटल असून बोनसची रक्कम ३५ हजारांपर्यंत होत असून मा.मुख्यमंत्री यांनी केलेल्या घोषणेनुसार दोन हेक्टरच्या मर्यादेत १५ हजार प्रमाणे फक्त ३० हजार रुपयेच मिळणार असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोनस रक्कमेत वाढ करुन त्यासंबंधीचे आदेश पारित करण्याची मागणी दि. ३१ जानेवारी, २०२३ रोजी शेतकऱ्यांकडून शासनास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मागणीनुसार शेतकऱ्यांच्या बोनस रक्कमेत वाढ करुन सदर रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत किंमत व्यतिरिक्त प्रति हेक्टरी रु.१५०००/- (दोन हेक्टर मर्यादेत) प्रोत्साहनपर राशी देण्यात येत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत नाही.

(४) व (५) धानाला प्रति क्विंटल प्रोत्साहनपर राशी (बोनस) मिळणेबाबत लोकप्रतिनिधींची पत्र प्राप्त झाली आहेत.

तथापि, धान उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत किंमत व्यतिरिक्त प्रति हेक्टरी रु.१५०००/- (दोन हेक्टर मर्यादेत) प्रोत्साहनपर राशी देण्यात येत असल्याने वेगळ्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शासकीय शाळांमधील बंद वीज पुरवठा सुरु करण्याबाबत

**(४) * ५६५१४ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांचे डिजीटायझेशन करण्याचा मुद्दा चर्चेत असतांना पालघर, जळगांव, नाशिक, नंदूरबार या जिल्ह्यासह राज्यातील ९२६२ शासकीय शाळा विजेअभावी अंधारात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेची भींत जीर्ण किंवा पडली असेल अशा स्थितीत वीज मीटर काढण्यात यावे अशा सूचना जिल्हास्तरावरील संबंधित विद्युत वितरण कंपनी अधिकाऱ्यांना शासनाने दिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, थकीत वीज देयकापोटी शाळांचा विजपुरवठा खंडीत करण्यात येऊ नये अशा सूचना महावितरणला दिलेल्या असतांनाही थकीत वीज बीलापोटी २५३० शाळांचे वीज मीटर महावितरणने काढून नेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विजेची साधनसामुग्री उभारण्याकरीता वा वीज जोडणीसाठी शाळांना शासनाकडून निधी मिळत असला तरी विद्युत देयके भरण्यासाठी विशेष अनुदान मिळत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात वीजेची थकबाकी वाढत असून त्यामुळे वीज पुरवठा देखील खंडीत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांना विद्युत देयके भरण्यासाठी विशेष अनुदान देऊन शाळांचा विद्युत पुरवठा पुर्ववत करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

राज्यातील जिल्हा परिषदांच्या थकीत वीज देयकांकरीता रु. १८.५६ कोटी निधी आवश्यक असल्याचे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने कळविले असून, त्यानुसार सदर रक्कम दि.६/२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात आली आहे.

त्यानुसार, राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांच्या थकीत विज देयकांचा भरणा महाराष्ट्र वीज वितरण कंपनीस करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत संयुक्त शाळा अनुदान अंतर्गत आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता रु.१७९ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांच्या खंडीत व थकीत वीज देयकांची रक्कम अदा करण्यासाठी सन २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षात अनुक्रमे रु.५.८८ कोटी व रु.१४.८८ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यानुसार थकीत वीज देयकांची रक्कम महावितरण कार्यालयास अदा करण्यात आली आहे. तसेच, सन २०२२-२३ करीता जानेवारी, २०२३ पर्यंत वीज देयकाची थकीत रक्कम रु.१८.५६ कोटी इतकी आहे. सदर रक्कम शासन निर्णय, दि.०६.०२.२०२३ अन्वये आयुक्त (शिक्षण) यांना उपलब्ध करुन देण्यात आली असून थकीत वीज देयकाची रक्कम अदा करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर ते औरंगाबाद मार्गे धुळे (एनएच २११ ) या राष्ट्रीय महामार्गालगत बांधण्यात आलेल्या पर्यायी रस्त्याची झालेली दुरवस्था

**(५) * ६४२५३ श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर ते औरंगाबाद मार्गे धुळे (एनएच २११) या राष्ट्रीय महामार्गालगत कोटयवधी रुपये खर्च करुन बांधलेला सर्व्हिस रोड केवळ ११ महिन्यात खचल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निकृष्ट बांधकामाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित ठेकेदार व अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण : (**१) व (२) सदर महामार्ग केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित आहे. या महामार्गाच्या चौपदरीकणाअंतर्गत विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार सर्विस रस्त्याचे बांधकाम केलेले आहे. काही ठिकाणी सर्विस रस्ता खचल्याचे निदर्शनास आल्यानंतर कंत्राटदारामार्फत तात्काळ रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सोलापूर ते औरंगाबाद व औरंगाबाद ते तेलवाडी या प्रकल्पातील सर्विस रस्ता सुस्थितीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**संत गाडगेबाबा सहकारी सूतगिरणी मर्या. (ता.दर्यापूर, जि.अमरावती) बंद सूतगिरणी सुरु करण्याबाबत**

**(६) * ५८४४४ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत गाडगेबाबा सहकारी सूतगिरणी मर्या. (ता.दर्यापूर, जि.अमरावती) या सूतगिरणीची नोंदणी दिनांक ०९ एप्रिल, १९८१ रोजी करण्यात आली असून सदर सूतगिरणी सुरळीत सुरू असताना सन २००७ मध्ये राज्य सहकारी बँकेच्या थकीत रकमेचा सूतगिरणीने भरणा न केल्याने गिरणीची मशीनरी जप्त केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सूतगिरणीकडे स्वमालकीच्या एकूण ६०.१३ हे आर जमीनी पैकी ३० एकर शेतजमीन असून उर्वरीत जमीनीवर सूतगिरणीची इमारत व मशीनरी असून सदर सूतगिरणी सुरू असताना त्यात अंदाजे ८०० कामगार कार्यरत होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सूतगिरणी बंद झाल्याने मोठ्या प्रमाणावर कामगार बेरोजगार होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून सदर सूतगिरणीची पूर्ववत सुरू करण्याबाबत सतत मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली मा सहकार मंत्री, मा.वस्त्रोद्योग राज्यमंत्री, अपर मुख्य सचिव वित्त विभाग, प्रधान सचिव सहकार, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २१ ऑक्टोबर,२०२० रोजी तसेच मा.वस्त्रोद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० ऑगस्ट,२०२१ रोजी वा त्यासुमारास आयोजित केलेल्या बैठकीत तांत्रिक व आर्थिक निकषानुसार व्यवहार्यता तसेच वैधानिक अडचणीबाबत संबंधीत क्षेत्रातील तज्ञांकडून तपासून घेऊन अहवाल सादर करण्याचे आदेशीत करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.

(५) सदर सूतगिरणी पुर्ववत सुरु करण्याच्या दृष्टीने सूतगिरणीची यंत्रसामुग्री तांत्रिकदृष्टीने तपासणी करण्याकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई यांच्याकडून तपासून घेण्याबाबत वस्त्रोद्योग आयुक्तालयामार्फत सूतगिरणीच्या अवसायकास कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे वस्त्रोद्योग महासंघाने तांत्रिक तपासणी करुन सूतगिरणीची यंत्रसामुग्री व बांधकाम याबाबतचा सविस्तर अहवाल सूतगिरणीच्या अवसायकास सादर केला आहे. सूतगिरणी अवसायक यांनी सदर अहवालावरुन सूतगिरणीची मशीनरी पुर्ववत होण्याची शक्यता नसल्याचे आयुक्त (वस्त्रोद्योग) नागपूर यांना कळविले आहे. सदर सूतगिरणीची अवसायन कार्यवाही पुर्ण होण्याचे दृष्टीने सूतगिरणीचे अवसायक यांनी सूतगिरणीच्या मालमत्तेवर शासनाचा नावे बोजा चढविला असून सूतगिरणीच्या मालमत्तेचे अद्ययावत मुल्यांकन करुन मालमत्ता विक्री करीता निविदा प्रक्रीया अवसायकांमार्फत करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माढा ( जि.सोलापूर) येथील प्रशासकीय इमारतीच्या कामास होत असलेला विलंब

**(७) * ५८२२२ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) येथे प्रशासकीय भवन बांधण्यासाठी राज्य शासनाने माहे फेब्रुवारी, २०२० च्या अर्थसंकल्पामध्ये रुपये १३ कोटी मंजूर करुन त्याची वर्क ऑर्डर माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये काढण्यात येऊनही महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे प्रशासकीय भवन इमारतीच्या बांधकामास विलंब होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माढा तालुक्यातील १०९ गावांतील नागरीकांना महसूल, कृषी, वन, सिटी सर्व्हे, ट्रेझरी, दुय्यम सहाय्यक निबंधक संबंधित महत्वाची शासकीय कार्यालये वेगवेगळया ठिकाणी कार्यरत असल्याने नागरीकांना नाहक त्रास व आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रशासकीय भवनाचे बांधकाम तातडीने पुर्ण करुन त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय. अंशत: खरे आहे.

माढा येथे प्रशासकीय भवन बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र शासन निर्णय क्र.बीडीजी २०२०/प्र.क्र.९६/इमारती-३,दि.२७.२.२०२० अन्वये रु.१३११.३२ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर कामाचा कार्यारंभ आदेश दि.८.२.२०२२ रोजी देण्यात आला आहे. मंजूर प्रस्तावानुसार नवीन प्रशासकीय भवन हे अस्तित्वातील तहसिल कार्यालयाची जुनी इमारत पाडून, त्याच ठिकाणी बांधावयाचे आहे. स्थलांतरासाठी उपभोक्ता विभागास कळविण्यात आले होते. अस्तित्वातील तहसिल कार्यालय माहे जानेवारी २०२३ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या इमारतीमध्ये स्थलांतरीत झाले आहे. तथापि, अस्तित्वातील इमारतीतील शासकीय कोठडी (दुय्यम कारागृह) अद्यापि स्थलांतरीत झालेली नाही.
(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) नवीन मंजूर प्रशासकीय भवन हे जुने अस्तित्वातील तहसिल कार्यालय पाडून, त्याच ठिकाणी बांधावयाचे आहे.अस्तित्वातील तहसिल कार्यालय माहे जानेवारी २०२३ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या इमारतीमध्ये स्थलांतरीत झाले आहे.

तसेच, अस्तित्वातील इमारतीतील शासकीय कोठडी (दुय्यम कारागृह) अद्यापि स्थलांतरीत झालेली नाही. अस्तित्वातील इमारत पाडण्यासाठी महसूल व वन विभागामार्फत दि.१३.०२.२०२३ रोजी परवानगी देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन अस्तित्वातील जुनी तहसील इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यात येत आहे.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यात धान्य वाटप करताना होत असलेली अनियमितता

**(८) * ६०८२७ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: हिंगोली, परभणी, धाराशिव जिल्हयात गोदामातून स्वस्त धान्य दुकानदारांना नियतनाप्रमाणे दिले जाणारे धान्य व प्रत्यक्षात मिळणारे धान्य यातील वजनामध्ये तफावत असल्याच्या तक्रारी दुकानदारांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान केल्या असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात दुकानदारांनी तक्रार केल्यास दुकानाचा परवाना रद्द करुन दुकान बंद करण्याच्या धमक्या दुकानदारांना दिल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परभणी जिल्हयातील रेशन धान्य दुकानदारांकडून नियमबाहयपणे रक्कम वसुल करीत असल्याप्रकरणी येथील दुकानदारांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांचेकडे दिनांक ३१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास लेखी तक्रार दाखल केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वस्त धान्य दुकानदारांना नियतनाप्रमाणे धान्य वाटप होणेबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हिंगोली आणि परभणी या जिल्हयात अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे, दोन रास्तभाव दुकानदारांनी अशी तक्रार केलेली आहे.
(४) याबाबत तहसीलदार यांचेमार्फत सुनावणी घेऊन चौकशी केली असता तक्रारदारांनी आपली कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी म्हणणे सादर केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## बुलढाणा जिल्हयात रेशनच्या तांदळाचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(९) * ६१२९३ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात स्वस्त धान्याच्या दुकानात रेशनच्या तांदळाचा काळाबाजार होत असून शेगावसह जिल्हयात मोठे रॅकेट कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने आतापर्यंत किती दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सप्टेंबर, २०२२ पासून बुलढाणा जिल्ह्यात तांदळाच्या काळाबाजाराबाबत पाच विविध घटना निदर्शनास आल्या असून दोन घटनांमध्ये रास्त भाव दुकानदारांचा व इतर तीन घटनांमध्ये खाजगी व्यक्तींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.
(२) या प्रकरणातील माहिती खालीलप्रमाणे आहे :

(१) कृष्णाजीच्या मळयाजवळ, सरकारी फैल, ता. शेगाव येथून दि.१५.०९.२०२२ रोजी महिंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-२८-PP-००९४ मधील एकूण ३० क्विंटल तांदुळ जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोलिस स्टेशन, शेगाव, ता. शेगाव येथे दि.२०.०९.२०२२ रोजी अपराध क्र.०४५५/२०२२ अन्वये रास्त भाव दुकानदार, अध्यक्ष, श्रावण बहुद्देशीय संस्था, शेगाव, ता. शेगाव व वाहन चालक यांच्याविरुद्ध जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रावण बहुद्देशीय संस्था, शेगाव या रास्त भाव दुकानाचा परवाना जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांच्या दि.१९.०१.२०२३ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे.

(२) वहाळा खुर्द बस स्थानक, ता. खामगाव येथून दि.०२.१२.२०२२ रोजी महिंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-२८-AB-३६०१ मधील एकूण ३४ क्विंटल तांदुळ जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोलीस स्टेशन, खामगाव (ग्रामीण) येथे दि.०३.१२.२०२२ रोजी अपराध क्र.०४०८/२०२२ अन्वये रास्त भाव दुकानदार, मौजे अडगाव, ता. खामगाव, वाहन चालक व इतर दोन व्यक्ती यांच्याविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा,१९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मौजे अडगाव, ता. खामगाव येथील रास्त भाव दुकानाचा परवाना जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांच्या दि.२३.०२.२०२३ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे.

(३) हॉटेल विघ्नहर्ता, ता. शेगाव या हॉटेलच्या मागील बाजूस असणाऱ्या खाजगी गोडाऊन व ट्रक क्र. MH-३७-T-२५५७ मधून दि.१०.१२.२०२२ रोजी एकूण ४८० क्विंटल तांदुळ जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोलिस स्टेशन, शेगाव येथे दि.२२.१२.२०२२ रोजी अपराध क्र.०६२६/२०२२ अन्वये खाजगी गोदाम मालकाविरुद्ध जीवनावश्यक वस्तु कायदा,१९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) विकमशी चौक, ता. खामगाव येथून दि.०६.१२.२०२२ रोजी महिंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-१९-S- ७४९७ मधील एकूण ३० क्विंटल तांदुळ जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोलीस स्टेशन, खामगाव (शहर) येथे दि.०७.१२.२०२२ रोजी अपराध क्र.०६३५/२०२२ अन्वये संबंधित व्यक्ती व वाहन चालक यांच्याविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायदा,१९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) हिवरा आश्रम, ता.मेहकर येथून दि. ०२.०१.२०२३ रोजी महिंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-३१-CQ-८४११ मधील एकूण ४७ क्विंटल तांदुळ जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोलीस स्टेशन साखरखेर्डा, ता.मेहेकर येथे दि.०२.०१.२०२३ रोजी अपराध क्र.०००२/२०२३ अन्वये वाहन चालकाविरुध्द जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पाऱ्याचे अतिरिक्त प्रमाण असलेले फेअरनेस क्रीम लावल्यामुळे २० वर्षीय तरुणीसह तीची बहीण व आई यांच्या किडनीवर विपरित परिणाम झाल्याबाबत**

**(१०) * ६२२५२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात पाऱ्याचा अतिरिक्त प्रमाणात वापर करुन ब्युटीशिअनकडून स्थानिक कंपनीने बनविण्यात आलेले फेअसरनेस क्रिम लावल्याने एका २० वर्षीय तरुणीसह तीची बहीण व आई यांच्या किडनीवर विपरित परिणाम झाला असल्याचे माहे, फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तिघींना ग्लोमेरुलोनेफ्राइटिस या नावाचा आजार झाल्याने तातडीने वैद्यकीय उपचारासाठी केईएम रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केईएम रुग्णालयातील नेफ्रोलॉजीचे विभागाचे प्रमुख यांनी प्रयोगशाळेमध्ये या क्रीमसह अन्य वस्तुंची चाचणी केल्यास क्रिमध्ये पाऱ्याचे प्रमाण सहा ते सातपट अधिक असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,फेअसरनेस क्रिम मध्ये १ पीपीएमपेक्षा पार्टस पर मिलियन कमी पाऱ्याचे प्रमाण असावे लागते असा नियम आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबंधित फेअसरनेस क्रिम बनवण्याऱ्या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१), (२), (३) व (४) खरे आहे.
(५) सदर फेअरनेस क्रिमचे उत्पादन "अल हरमन व्हाईटनिंग क्रिम" नावाने मे. मेहेर ब्युटी पार्लर, मोमीनपुरा, अकोला येथे होत असल्याचे होत असल्याचे तपासात आढळून आले. सदर ठिकाणी जप्त केलेल्या सौंदर्य प्रसाधनावर उत्पादन परवाना, उत्पादकाचे नाव, समूह क्रमांक व इतर आवश्यक तपशिल नसल्याचे आढळून न आल्याने औषध निरिक्षक, अकोला यांनी ४ सौंदर्यं प्रसाधने नमुने विश्लेषणार्थ घेतले आहेत आणि सौंदर्यं प्रसाधनांचा एकूण रुपये २९,५१५/- इतक्या किंमतीचा साठा जप्त केलेला आहे.
चाचणीस्तव घेतलेल्या ४ सौंदर्य प्रसाधनांचे नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रलंबित आहेत. तपास पूर्ण करुन संबंधितांविरुदध् कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आदिवासी विकास महामंडळातील धान खरेदीत अनियमितता होत असल्याबाबत**

**(११) * ६१०६६ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळातील धान खरेदीमध्ये हंगाम २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये, NeML या संस्थेच्या ऑनलाईन पोर्टलवरील खरेदीच्या माहितीनुसार शासनाच्या नियमांचा भंग करून धान खरेदी करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाने प्रत्यक्षात धानाची खरेदी न करता केवळ ऑनलाईन धान खरेदीच्या नोंदी केल्या असून शेतकऱ्यांऐवजी अन्य व्यक्तीचा मोबाईल रजिस्टर्ड असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळाने NeML या संस्थेच्या ऑनलाईन पोर्टलचे ऑडिट केले नसल्याने धान खरेदीमध्ये अनियमितता होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) ऑनलाईन पोर्टलमुळे धान खरेदीमध्ये अनियमितता झाले असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, अभिकर्ता संस्थांनी वेळावेळी सुचविण्यात आलेल्या सुधारणा सदर पोर्टलवर करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सुलतानगादे-हिवरे (ता.खानापूर, जि.सांगली) येथील कराड-नागज तसेच खानापूर, आटपाडी, तासगाव (जि.सांगली) तालुक्यातील महामार्गांच्या कामाबाबत**

**(१२) * ६३०२३ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुलतानगादे, हिवरे (ता.खानापूर, जि.सांगली) येथील कराड-नागज महामार्गाचे काम प्रलंबित असल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच खानापूर, आटपाडी, तासगाव (जि.सांगली) तालुक्यातील ग्रामीण मार्ग व इजिमा रस्त्यांना प्रमुख जिल्हा मार्ग करुन दर्जोन्नती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रश्न भाग १ व २ बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सदर महामार्गाचे एकुण ४६.६५५ कि.मी.पैकी १०.०३ कि.मी. लांबीचे काम प्रलंबित आहे. परंतु सदर महामार्गाच्या प्रलंबित कामामुळे महामार्गावर अपघात झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) होय.

(३) या महामार्गाचे उर्वरित १०.०३ कि.मी. लांबीमध्ये आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर दुरुस्ती हाती घेण्यात येईल.

लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार खानापूर आटपाटी, तासगांव तसेच कवठे महांकाळ, कडेगांव (जि.सांगली) तालुक्यातील विविध योजनाबाह्य रस्ते, ग्रामीण मार्ग व इजिमा रस्त्यांना प्रमुख्य जिल्हा मार्ग करुन ५४०.१३० कि.मी. लांबी दर्जोन्नती करणेबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील अनुसूचित जाती/जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी सायकल खरेदी व शाळांना सौर संच बसवणेबाबत

**(१३) * ६३३२० श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील अनुसूचित जाती/जमातींच्या इयत्ता ७ वी व ८ वीतील मुलींना जिल्हा वार्षिक योजना सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ अंतर्गत सायकल वाटप करण्यासाठी विशेष तरतूद म्हणून सायकल खरेदीसाठी व शाळांना सौर संच बसवण्यासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागातील अधिकारी व कंत्राटदार यांच्या नियोजनाअभावी सदर निधी अखर्चित राहून परत गेल्यामुळे जिल्ह्यातील १५०० विद्यार्थीनी सायकल पासून व १४२ शाळा सौर संचांच्या लाभापासून वंचित राहिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जबाबदार अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचेकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) सौर संच बसविण्याचे काम पूर्ण झालेले आहे. सायकलसाठी दोनवेळा निविदा प्रक्रिया पूर्ण करुनही पुरवठादाराकडून प्रतिसाद मिळाला नसल्याने त्यासाठी प्रस्तावित रक्कम समर्पित करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील रुग्णांची रुग्णालयांकडून होत असलेली फसवणूक

**(१४) * ६१९७९ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नामांकित रुग्णालयात वैद्यकीय सहाय्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यासाठी कमाल किंमती पेक्षा (एम आर पी) अधिक शुल्क आकारात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात वैद्यमापन शास्त्र यंत्रणा विभागाने मुंबईतील काही नामवंत रुग्णालयांवर गुन्हे नोंदविले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गुन्ह्यांनुसार रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच यासंदर्भात राज्यातील अन्य रुग्णालयांची तपासणी शासनाने केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही,
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वारे (ता.कर्जत,जि.रायगड) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वारे-चिंचवाडी-देवपाडा लगतच्या जागेवरील अतिक्रमण निष्काषीत करण्याबाबत

**(१५) * ६३६१४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारे (ता.कर्जत,जि.रायगड) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वारे-चिंचवाडी-देवपाडा रस्त्यालगत असलेल्या जमिनीचा विकास करताना जमीन मालकांनी शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन रस्त्याच्या साईड पट्टीवर दगडी भिंतीचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी असलेल्या वळणाच्या रस्त्यावर बांधकाम झाल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता असल्याने सदरहू अतिक्रमण काढण्याबाबत उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कर्जत उपविभाग, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, रायगड यांच्याकडे सातत्याने तक्रार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सदर बांधकाम निष्काषीत करुन संबंधितांवर कारवाई होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) निवेदन प्राप्त आहे.
(३) रायगड जिल्हयाच्या कर्जत तालुक्यातील दहिवली-देवपाडा-वारे-कुरुंग नांदगांव या प्रमुख जिल्हा मार्ग क्र. १०३ च्या रस्त्यालगत कि.मी. ८/३०० मध्ये रस्त्याच्या कडेपासून सरासरी २.४० मीटर अंतरावर दगडी भिंतीचे बांधकाम करण्यात आले असून सदरचे अतिक्रमण तात्काळ काढण्याकरिता संबंधित अतिक्रमणधारकास दिनांक ०३-०२-२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोटीस बजाविण्यात आलेली असून आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ वर उड्डाणपूल तसेच स्लीप सर्व्हीस रोडच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करणेबाबत

**(१६) * ६३८६० श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढलेले असून त्यात मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहन अपघात व जिवीतहानी टाळण्याच्यादृष्टीने राष्ट्रीय महामार्ग व बायपास रोडवर उड्डाणपूल बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे अनेकदा मागणी करुन पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच बीड शहराच्या बाहेरुन १२ कि.मी.चा बायपास रस्ता असून स्लिप सर्व्हिस रोड तयार करण्याबाबत देखील प्रशासनाबरोबर वारंवार बैठका घेण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर राष्ट्रीय महामार्ग-५२ अंतर्गत बीड शहरातून जाणाऱ्या रस्त्यावर उड्डाणपूल तसेच शहराबाहेरील बायपास रस्त्यावर स्लिप सर्व्हीस रोडचे बांधकाम व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सदर महामार्ग केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

पोलिस विभागाच्या अहवालानुसार मागील ३ महिन्यामध्ये बीड बायपास वर होणारे अपघात हे किरकोळ स्वरुपाचे असून जीवितहानी झालेली नाही.
(२) राष्ट्रीय महामार्ग व बायपास रोडवर उड्डाणपूल बांधण्यासाठी कुठलीही मागणी प्राप्त नाही.
(३) होय. या विषयास अनुसरुन तशी मागणीच्या स्वरुपाची बैठक झालेली आहे.
(४) स्लिप रोड संदर्भात प्रस्ताव तयार करुन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकारी यांचे मंजुरी करीता सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जांब-पारवा (ता.जि.परभणी) रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१७) * ६४१०२ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जांब-पारवा (ता.जि.परभणी) रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहनधारक व प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असून रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी जांब, पारवा व परिसरातील नागरीकांनी संबंधित विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे तसेच किती कालावधीत सदर काम पुर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सदर लांबीत डांबरीकरण व मजबुतीकरणाचे मंजूर काम सद्यस्थितीत प्रगतीत आहे. सदर रस्त्यावरील वाहतूकीस कोणताही अडथळा नसून वाहतूक सुरळीत चालू आहे.
(२) निवेदन प्राप्त नाही.
(३) सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ६/०२/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला असून सदरचे काम माहे फेब्रुवारी, २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तिसगाव (जि.सांगली) येथील विद्यानिकेतन शाळेतील**
**शिक्षिकेचा संस्थेचे अध्यक्ष यांनी विनयभंग केल्याबाबत**

**(१८) * ६४१६८ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिसगाव (जि.सांगली) येथील जीवन विकास संस्थेच्या महाराष्ट्र रत्न वी.स. पागे विद्या निकेतन शाळेतील शिक्षिकेचा संस्थेचे अध्यक्ष यांनी विनयभंग केल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबंधित शिक्षकेने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
संबंधित शिक्षिकेने दिनांक २ डिसेंबर, २०२२ रोजी शाळेच्या मुख्याध्यापकांकडे तक्रार केली असून त्याची प्रत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,सांगली व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांना पाठविली आहे.
(३) संबंधित शाळेतील महिला तक्रार निवारण समिती व मुख्याध्यापक यांच्या जबाबानुसार अशी घटना घडलेली नसल्याचा अहवाल दिला आहे.तथापि शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली यांनी पुढील तपासासाठी सदर अर्ज स्थानिक पोलीस स्टेशनकडे पाठविला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.औरंगाबाद) येथे शासकीय धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(१९) * ६४२७१ श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) येथे शासकीय तांदळाचा साठा काळया बाजारात विक्री करण्यासाठी नेताना लाड रस्त्यावर माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान पकडण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक ३०.१२.२०२२ रोजी वैजापूर, जिल्हा औरंगाबाद येथे शासकीय तांदूळ काळ्या बाजारात विक्रीकरीता घेऊन जात असल्याबाबतची गोपनीय माहिती प्राप्त झाल्यामुळे वैजापूर पोलीस ठाण्यामार्फत दोन वाहनांमधील तांदूळ जप्त करण्याची कारवाई करण्यात आली होती.

याबाबत तहसील कार्यालय वैजापूर यांच्याकडे खातरजमा केली असता सदरचा तांदूळ शासकीय नसल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदरचा तांदूळ हा खरेदीदार यांनी खाजगी व्यापाऱ्याकडून खरेदी केला असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यामुळे जप्त करण्यात आलेला तांदूळ दिनांक १३.०१.२०२३ रोजी खरेदीदार यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## अहमदनगर एम.आय.डी.सी.मधील निवासी राखीव भुखंडाऐवजी दुसऱ्या भुखंडाचे वाटप करण्यात आल्याबाबत

**(२०) * ६४०१७ श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर एम.आय.डी.सी.मध्ये निवासी जागेकरीता राखीव असलेला भुखंड क्र.आर.एच.-६२ चे लाभार्थ्याला देकार पत्र देऊन आणि लाभार्थ्याने सर्व रक्कमेचा भरणा केल्यानंतर एम.आय.डी.सी.कडून अचानकपणे निर्णय बदलून उक्त भुखंडाऐवजी निवासासाठी योग्य नसलेल्या आर.एल.-१३ या भूखंडाचे वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांनी त्यांना मुळ भूखंडाचेच वाटप करण्यात यावे अशी मागणी दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजी प्रादेशिक कार्यालय, नाशिक, पुणे आणि मा.उद्योगमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रतिक्षा यादीवर असलेल्या लाभार्थ्यांना प्रथम भूखंडाचे वाटप करणे आवश्यक असतांनाही तसे न करता प्रतिक्षा यादीवर नसणाऱ्या लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

श्री.शशिकांत भास्करराव गवांदे व श्री.चंद्रकांत भास्करराव गवांदे (अर्जदार) यांना मऔवि महामंडळामार्फत दि. ०४/०३/२००३ रोजी ४०० चौ.मी. क्षेत्राच्या निवासी भूखंडाचे देकारपत्र देण्यात आले होते. सदर देकारपत्रात फक्त क्षेत्राचा उल्लेख असून भूखंड क्रमांकाचा कोणताही उल्लेख नाही. अर्जदार यांनी भूखंडाची फक्त ५० टक्के इसारा रक्कमच जमा केली होती.

अर्जदारास तद्नंतर दि. ०९/०६/२००३ रोजी भूखंड क्र. आरएल-१३, क्षेत्र ३९० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, अर्जदार यांचा निवासी भूखंड मिळण्याबाबतचा अर्ज दि. २८/११/२०२२ रोजी प्रादेशिक अधिकारी, मऔविम,नाशिक यांना प्राप्त झाला आहे. निवासी भूखंडाचे वाटप निविदेव्दारे करण्याचे धोरण मऔवि महामंडळाने दि. ०७/०१/२०१६ च्या परिपत्रकान्वये लागू केले आहे. त्यानुसार अर्जदारास प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांनी दि. ०८/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अर्जदारास कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बंद उद्योग हस्तांतरणाच्या दृष्टीने व्यवहार्य अशी नवीन उपाययोजना तथा नियमावलीत बदल करण्याबाबत

**(२१) * ६१०६७ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच औद्योगिक शहरात सुमारे ४५,५०० उद्योग बंद असल्याने हजारो कोटी रुपयांची स्थिर मालमत्ता वापराविना पडून असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योग विभागाकडील सामुहिक प्रोत्साहन योजनेच्या नियमावलीतील प्रचलित तरतुदीनुसार कर्ज देणाऱ्या बँकांना असे बंद उद्योग नवीन उद्योजकास साधारणपणे ०५ वर्षाचा कालावधी पुर्ण केल्याशिवाय हस्तांतरित करता येत नसल्याने याची जप्ती व विक्री करता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन उद्योग उभारणी करण्यासाठी येणाऱ्या नवीन उद्योजकास लवकर भूखंड उपलब्ध होत नसणे तसेच बंद उद्योगामुळे आर्थिक उलाढाल होत नसल्यामुळे शासनास कोणत्याही प्रकारचा महसुल मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून सामुहिक प्रोत्साहन योजनेच्या नियमावलीत बंद उद्योग हस्तांतरणाच्या दृष्टीने नवीन उपाययोजना तथा नियमावलीत बदल करण्याबाबत शासनाकडून कोणत्या उपायोजना करण्यात आल्या वा येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

राज्यातील औद्योगिक शहरात हजारो कोटी रुपयांची स्थिर मालमत्ता वापराविना पडुन असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आल्याबाबत राज्यातील कोणत्याही औद्योगिक संघटना अथवा उद्योजकांकडून निवेदने प्राप्त झालेली नाहीत.

(२) व (३) प्रचलित सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत योजनेच्या विहित अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पात्र उत्पादक उद्योग घटकांना अंमलबजावणी यंत्रणेमार्फत घटक उत्पादनांत गेल्यानंतर पात्रता प्रमाणपत्र निर्गमित केले जाते. सदर उद्योग घटक हा त्या उद्योग घटकाची गुंतवणूक व सदर घटक ज्या तालुक्यात प्रस्तावित होत आहे त्या तालुक्याच्या वर्गीकरणानुसार योजनेंतर्गत प्रोत्साहनांकरीता अनुज्ञेय केला जातो. सदर पात्रता प्रमाणपत्र निर्गमित केल्यानंतर प्रचलित योजनेच्या मार्गदर्शक तत्वात नमूद केल्याप्रमाणे घटकाला औद्योगिक प्रोत्साहन कालावधीसह

कार्यान्वय कालावधी ( Operative Period ) पुर्ण होईपर्यंत घटक उत्पादनात कार्यरत असणे आवश्यक आहे. घटक काही तांत्रिक अडचणींमुळे वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यास असमर्थ असल्यास किंवा इतर काही कारणांमुळे दिवाळखोरीत निघाल्यास संबंधित वित्तीय संस्थांकडून सदर घटकाचा ताबा घेण्यात येऊन वित्तीय संस्थेच्या कर्जाच्या वसुलीकरिता घटक लिलावाद्वारे किंवा जप्ती / विक्री प्रक्रियेतून विकला जातो. अशा लिलावाद्वारे विक्री झालेल्या घटकाचा औद्योगिक प्रोत्साहन अनुदानाचा कालावधी तसेच स्थिर भांडवली गुंतवणूक शिल्लक असल्यास विकत घेतलेल्या घटकाला साप्रोयो अंतर्गतच्या मार्गदर्शक सूचनेनुसार उर्वरित प्रोत्साहने पात्रता प्रमाणपत्राच्या उर्वरित कालावधीकरीता पात्र ठरत असल्यास अनुज्ञेय करता येतो.
(४) सामुहिक प्रोत्साहन योजनेचा शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ आणि योजनेची मार्गदर्शक तत्वे निर्गमित करताना बंद उद्योग घटकांच्या हस्तांतरणाच्या दृष्टीने देखील समावेश करण्यात आलेला आहे.
(५) लागू नाही.

-----------------

## कवठेमहांकाळ (जि. सांगली) तालुक्यातील जिल्हा परिषद व माध्यमिक शाळांना शालेय पोषण आहाराच्या तांदूळाचे वाटप होत नसल्याबाबत

**(२२) * ६३०४२ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कवठेमहांकाळ तालुक्यातील (जि. सांगली) जिल्हा परिषद व माध्यमिक शाळांना शालेय पोषण आहाराचे तांदूळच मिळत नसल्याने बचत गट व शाळांमध्ये धान्य टंचाईला समोरे जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सद्यस्थितीत कवठेमहांकाळ तालुक्यातील सर्व शाळांना तांदुळ प्राप्त झाला असून शालेय पोषण आहार सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.